आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७ डिसेंबर २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं इथिओपियाच्या संसदेत भाषण/ ग्लोबल साऊथच्या भविष्याबाबत व्यक्त केला विश्वास

- सन २०२४-२५ मधे देशातलं कोळसा उत्पादन एक अब्ज टनापर्यंत पोहोचलं

- अंमलबजावणी संचालनालयाचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत काँग्रेसची संसद भवन परिसरात निदर्शनं

- ऑस्कर नामांकनाच्या निवडक १५ चित्रपटांमधे होमबाऊंड या भारतीय चित्रपटाचा समावेश

**आणि**

- गोवा नाईट क्लब आग प्रकरणी या क्लबचे मालक गौरव आणि सौरव लुथरा यांना आज न्यायालयात हजर करणार

**<><><><><>**

"ग्लोबल साऊथ स्वतःचं भविष्य घडवत आहे, भारत आणि इथियोपिया या दोन्ही देशांकडे त्या संदर्भातल्या संकल्पना आहेत", असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. प्रधानमंत्र्यांनी आज इथियोपियाच्या संसदेला संबोधित केलं. इथियोपियाला सिंहाची भूमी असं संबोधून भारतातील गुजरात हीसुद्धा सिंहाची भूमी म्हणून ओळखली जाते असं सांगत, भारत आणि इथियोपियामधील हवामानासह अनेक साम्य प्रधानमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केली. वी द पीपल हे शब्द भारतीय संविधानाच्या सुरवातीला आहेत तर इथिओपियाचं संविधान वी द नेशन नॅशनॅलिटीज अँड पीपल ऑफ इथिओपिया या शब्दांनी सुरु होतं तसंच वंदेमातरम हे भारताचं राष्ट्रीयगीत आणि इथियोपियाचं राष्ट्रगीत या दोन्हीमध्ये देशाला मातृभूमी म्हणून संबोधलं आहे, असं सांगून दोन्ही देशांमध्ये समान संस्कृती आहे असं त्यांनी सांगितलं.

**... होल्ड- बाईट - प्रधानमंत्री - - -**

दोन हजार वर्षांपूर्वी आपल्या पूर्वजांनी सागरी व्यापाराच्या माध्यमातून सोने आणि मसाले यांच्या देवाण घेवाण केली  त्याचसोबत त्यांनी संकल्पना आणि  राहणीमान यांचीही देवाण घेवाण केली असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. अदिस अबाबा आणि धोलेरा ही व्यापाराचीच नाही तर संस्कृतीची केंद्रे होती असं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी केलं. महात्मा गांधीनी आपल्याला  काळजीवाहू ही संकल्पना दिली. या ग्रहावरच्या संसाधनाचे आपण काळजीवाहू आहोत आणि ही संसाधने आपल्याला पुढच्या पिढीपर्यंत पोचवायची  आहेत असं प्रतिपादन त्यानी केलं. त्या दृष्टीनेच ‘एक पेड माँ के नाम’ ही योजना आपण सुरु केल्याचं त्यांनी  सागितलं. आफ्रिकन देशांना जी20 चे कायमस्वरुपी सदस्य करुन घेण्यासाठी तसंच इथियोपियाला ब्रिक्सचं सदस्य करुन घेण्यात भारतानं महत्वाची भूमिका बजावली हे यावेळी प्रधानंत्र्यांनी अधोरेखित केलं.

इथियोपियाचे प्रधानमंत्री अबीय अहमद अली यांच्यासोबत अदिस अबाबा इथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची विस्तृत चर्चा झाली.  या भेटीत आठ करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. अदवा व्हिक्टरी मेमोरियल संग्रहालयालाही त्यांनी भेट दिली. जागतिक पातळीवरील दूरदर्शी नेतृत्व आणि भारत-इथियोपिया भागीदारी बळकट करण्यामध्ये लक्षणीय योगदान दिल्याबद्दल मोदी यांना काल इथियोपियाचे प्रधानमंत्री डॉ.अबी अहमद अली यांच्या हस्ते, ‘द ग्रेट ऑनर निशान ऑफ इथियोपिया’ सन्मानानं गौरवण्यात आलं. हा पुरस्कार मिळवणारे मोदी पहिलेच जागतिक राष्ट्रप्रमुख आहेत.  तर मोदींना मिळालेला हा २८वा परदेशी पुरस्कार आहे.

**<><><><><>**

सन २०२४-२५ मधे देशातलं कोळसा उत्पादन एक अब्ज टनापर्यंत गेल्याचं कोळसा मंत्री जी किशन रेड्डी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात  एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.  कोळसा उत्पादन क्षेत्रात गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या आहेत. भारत हा  जगातला दुसऱ्या क्रमांकाचा कोळसा उत्पादक आणि वापरकर्ता देश असल्याचं रेड्डी यांनी सांगितलं. कोळशापासून वायू निर्मिती करण्यावर सरकारचा भर असून २०३० पर्यंत १० कोटी टन निर्मिती करण्याचं लक्ष आहे, भूमिगत वायू निर्मिती करण्याची क्षमता असलेल्या २१ कोळसा खाणींचा लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

दोन हजार किलोमीटर रेल्वेमार्गांवर कवच प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. प्रवासी आणि रेल्वेच्या सुरक्षेसाठी कवच ही स्वयंचलित ट्रेन सुरक्षा प्रणाली सुरू करण्यात आली असून आतापर्यंत चार हजार किलोमीटर रेल्वेमार्गावर ही प्रणाली स्थापित करण्यात आल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><>**

अंमलबजावणी संचालनालयाचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत आज काँग्रेस खासदारांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरोधातल्या मनी लाँड्रिंग प्रकरणी दाखल आरोपपत्राची दखल घ्यायला दिल्लीतल्या न्यायालयाने नकार दिला, या पार्श्वभूमीवर सोनिया गांधी आणि राहुल गांधींविरोधात केंद्र सरकार ईडीचा गैरवापर करत असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला. काँग्रेस खासदारांनी संसद भवन परिसरात सरकारविरोधी घोषणाबाजी करत सरकारने गांधी कुटुंबाची माफी मागण्याची मागणी केली.

**<><><><>**

I N A S 335 ऑस्पेज हे दुसरं MH-60R सीहॉक हेलिकॉप्टर स्कॉड्रन नौदलाच्या ताफ्यात दाखल होण्यासाठी सज्ज झालं आहे. गोव्यातल्या INS हंसा या नौदलतळावर आज दुपारी होणाऱ्या कार्यक्रमात नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या उपस्थितीत I N A S 335 ऑस्पेज नौदलाच्या ताफ्यात दाखल होईल. अत्याधुनिक शस्त्र, सेन्सर्सने सुसज्ज असलेल्या I N A S 335 ऑस्पेजमधे पाणबुडीविरोधी युद्ध, पृष्ठभागावरल्या हल्ल्यांचा सामना करण्याची क्षमता आहे. यामुळे नौदलाची लांबपल्ल्यावर मारा करण्याची क्षमता वाढणार आहे.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या कर्नाटक, तमिळनाडू आणि तेलंगण या ३ राज्यांच्या दौऱ्यावर आहेत. तमिळनाडूत वेल्लोर इथं आज राज्यपाल आर एन रवि, आणि माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डी मुरुगन यांनी त्यांचं स्वागत केलं. राष्ट्रपती मुर्मू यांनी नंतर पेरुमल मंदिरात आरती केली तसंच गणेश आणि सोर्णलक्ष्मी मंदिरातही दर्शन घेतलं. तमिळनाडूनंतर राष्ट्रपती तेलंगणला जाणार आहेत.

**<><><><>**

ऑस्कर २०२६ अर्थात ९८व्या अकॅडेमी पारितोषिकांसाठीच्या अंतिम फेरीत होमबाऊंड हा भारतीय चित्रपट प्राथमिक फेरी पार करून निवडक पंधरा चित्रपटांच्या यादीत पोचला आहे. नीरज घायवान दिग्दर्शित हा भारतीय चित्रपट आंतरराष्ट्रीय चित्रपटाच्या श्रेणीत आहे. या यादीतल्या चित्रपटांचं अंतिम नामांकन २२ जानेवारीला जाहीर होईल. ९८वा अकादमी पुरस्कार सोहळा १५ मार्च २०२६ रोजी होणार आहे.

**<><><><><>**

अद्ययावत सुविधा देणारं महाराष्ट्रातलं पहिलं जेन झी टपाल कार्यालय मुंबईत सुरू होत असून आयआयटी मुंबई परिसरात उद्या या कार्यालयाचं उद्घाटन होणार आहे. याविषयी अधिक माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

***-------व्हीसी------***

*(जेन झी अर्थात तरुण पिढीला टपाल सेवेकडे आकर्षित करण्यासाठी जेन झी टपाल कार्यालयाची संकल्पना देशभरात राबवली जात आहे. दिल्ली, केरळ, बिहार, गुजरात आणि आंध्रप्रदेशात हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आता मुंबईत जेन झी टपाल कार्यालय सुरू होत आहे. मोफत वाय-फाय सुविधा, कॅफेटेरिया, वाचनालय, संगीत कक्ष या सुविधांनी सुसज्ज असलेल्या या कार्यालयात पूर्णपणे डिजिटल, क्यूआर आधारित सेवा वितरण, आधार नोंदणी आणि अद्ययावत करण्याची सोय देखील असेल. तसंच या टपाल कार्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलती दिल्या जाणार आहेत. स्पीड पोस्ट सेवांवर दहा टक्के सवलत तर मोठ्या प्रमाणात पार्सल पाठवणाऱ्या ग्राहकांना पाच टक्के सवलत दिली जाणार आहे. परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून टपाल कार्यालयाला एक सामुदायिक केंद्र म्हणून ओळख निर्माण करणं हा यामागील हेतू आहे. महाराष्ट्र आणि गोवा परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंह आणि भारतीय टपाल सेवेच्या टपाल सेवा संचालक केया अरोरा यांच्या हस्ते, आयआयटी मुंबईच्या कुलसचिवांच्या उपस्थितीत, उद्या या टपाल कार्यालयाचं उद्घाटन होणार आहे.)*

**<><><><><>**

गोवा नाईट क्लब आग प्रकरणी या क्लबचे मालक गौरव आणि सौरव लुथरा यांना आज पोलिसांनी दिल्लीहून गोव्यात नेलं. आज त्या दोघांना म्हापशातल्या न्यायालयासमोर हजर केलं जाईल. ६ डिसेंबर रोजी या नाईट क्लबला लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू

झाला होता. दुर्घटनेनंतर काही तासांतच लुथरा बंधू थायलंडला पळून गेले होते. भारत सरकारच्या विनंतीवरून थायलंड पोलिसांनी त्यांना फुकेतमधे ११ डिसेंबरला ताब्यात घेतलं आणि काल त्यांना भारतात परत पाठवण्यात आलं. या प्रकरणी आतापर्यंत गोवा पोलिसांनी क्लबचे ५ व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांना अटक केली आहे.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातला चौथा ट्वेंटी ट्वेंटी क्रिकेट सामना आज संध्याकाळी ७ वाजता लखनऊ इथं खेळला जाणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत दोन सामने जिंकून आघाडीवर आहे.

**<><><><><>**

१९ वर्षांखालील मुलांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारतीय संघानं मलेशियाच्या संघावर ३१५ धावांनी विजय मिळवला. दुबई इथं झालेल्या सामन्यात भारतानं ५० षटकांत ४०८ धावा केल्या. या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना मलेशियाचे सर्व फलंदाज ३२ षटकांत केवळ ९३ धावांवर बाद झाले.

**//<><><><><>//**